www.epunyanagari.com Toll Free 9773927928

# पुण्य नगरी

सातारा ◆ मंगळवार, ९ फेब्रुवारी २०२१ । वर्ष : १७ । अंक : ३०८ । पाने १०+४ =१४ ★ किंमत : ₹ ५.००

# डॉ. कांचन नलावडे यांची शिविम कार्यकारणीवर निवड



**सातारा** / प्रतिनिधी

येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील मराठी विभागातील सहाय्यक प्राध्यापिका डॉ. कांचन विजय नलवडे यांची शिवाजी विद्यापीठाच्या मराठी शिक्षक कार्यकारिणीवर सदस्य म्हणून निवड करण्यात आली. तासगाव येथे पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ कार्यकारिणीचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात त्यांची निवड करण्यात आली. शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ ही मराठीच्या प्राध्यापकांची नोंदणीकृत संघटना असून महाराष्ट्रात आणि देशातील ती एक कार्यक्षम संघटना आहे. त्यांची या कार्यकारिणीवर निवड झाल्याबद्दल रयत शिक्षण संस्थेचे सचिव व छत्रपती शिवाजी कॉलेजचे प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर, रयत शिक्षण संस्थेचे ऑडीटर प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, उपप्राचार्या डॉ.अनिसा मुजावर, मराठी विभाग प्रमुख डॉ. सुभाष वाघमारे, डॉ. सुरेश झोडगे, गुणवत्ता हमी कक्षचे डॉ. अनिल वावरे, प्राध्यापक डॉ. मानसी लाटकर, प्रा. गजानन चव्हाण, डॉ. संजयकुमार सरगडे व सिनिअर व ज्युनिअर स्टाफ यांनी अभिनंदन केले.

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.